**दिन विशेष...**

✻ धुम्रपान विरोधीदिन

१९१९ : गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट अंमलात आला व देशात कायदे मंडळ स्थापन झाली.

१९५५ : डॉ.शांतीस्वरूप भटनागर यांचा स्मृतीदिन

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,६७५.०८ -२०.४६ (०.०२४%)
डॉलर ₹ ८९.८७

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १० |
| दिल्ली | २१ | ०८ |
| मुंबई | २८ | १९ |
| नागपूर | २८ | १२ |
| पुणे | २९ | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार, दि. १ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५३ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

आपण बघीतलेले स्वप्न, ध्येय गाठण्यासाठी ठरवलेला प्रत्येक पाऊल पुढे नेतो.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०४ संध्या-५:५७

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३८,०४५/- २,४०,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# भाजपचे राज्यभरात ७ नगरसेवक बिनविरोध

## जळगावात १, कल्याण-डोंबवलीत ३, धुळ्यात २ तर पनवेलमधून १ उमेदवार बिनविरोध

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यभरात महापालिका निवडणुकांचा धुराळा उडताना दिसत आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत भाजपने आपलं पहिलं खातं उघडल्याची बातमी ताजी असताना आता राज्यभरात ४ ठिकाणी ७ जागांवर भाजपच्या नगरसेविकांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती समोर येत आहे. कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजपने विजयाचं पहिलं खातं उघडलं. केडीएमसी प्रभाग अमधून रेखा राजन चौधरी यांचा विजय झाला. रेखा चौधरी यांच्याविरोधात एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नसल्याने त्यांचा बिनविरोध विजय झाला आहे. विशेष म्हणजे केडीएमसीत पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या भाजपच्या २६ क प्रभागाच्या उमेदवार आसावरी नवरे यांचाही विजय झाला आहे. या विजयानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोनद्वारे दोन्ही विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.**

या दोन्ही उमेदवारांच्या बिनविरोधाची बातमी ताजी असतानाच आता आणखी एक नवी बातमी समोर आली आहे. कल्याण डोंबिवलीत प्रभाग २६ ब मधून रंजना मितेश पेणकर यांचा बिनविरोध विजय झाला आहे. रंजना पेणकर यांच्यासमोर एका अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल केला होता. पण अर्ज छाननीत या उमेदवाराचा अर्ज बाद झाला. तर रंजना यांच्यासमोर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेकडून उमेदवार देण्यात आला नव्हता, अशी देखील माहिती समोर येत आहे.



कल्याण डोंबिवलीत ३ महिला नगरसेविकांची बिनविरोध निवड झाल्यानंतर आता धुळ्यातूनही भाजपसाठी गुड न्यूज समोर आली आहे. धुळे महानगरपालिका निवडणुकीतही भाजपने आपलं पहिलं खातं उघडलं. धुळे शहरातील प्रभाग क्रमांक एकमधील भाजपच्या उमेदवार (पान २ वर)

### ● जळगावात उज्वला बेंडाळे बिनविरोध...

जळगाव शहर महानगरपालिका निवडणुकीत भाजपाने आपले खाते उघडले असून प्रभाग क्रमांक ७ मधील भाजपाच्या उमेदवार उज्वला चंद्रकांत बेंडाळे या बिनविरोध झाल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांना बिनविरोध घोषित केले आहे. त्यांच्या विरोधातील महिला उमेदवार यांनी वैशाली पाटील यांनी प्रभाग क्रमांक १२ मध्ये ब (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग), क (सर्वसाधारण महिला ) आणि ड (सर्वसाधारण) यामध्ये अर्ज भरला होता. त्यापैकी ब व ड मधील त्यांचा अर्ज बाद झाल्याने त्यांची उमेदवारी क मध्ये राहिल्याने. भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग क्रमांक ७ ब नागरिकांचा (मागासवर्ग प्रवर्ग) च्या उमेदवार उज्वला बेंडाळे ह्या बिनविरोध झाल्या आहेत.

## स्वच्छ शहर इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे ७ जणांचा मृत्यू

प्रतिनिधी । इंदूर

मध्य प्रदेशातील इंदूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. इंदूरच्या भागीरथपुरा भागात दूषित पाणी प्यायल्यामुळे ७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तर १०० पेक्षा जास्त जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती इंदूरच्या महापौरांनी बुधवारी सांगितली आहे.




या घटनेत ३ जणांच्या मृत्यूची अधिकृतपणे पुष्टी झाली आहे. तसेच इतर ४ जणांच्या मृत्यूची माहिती आताच मिळाली आह, असं इंदूरचे महापौर पुष्यमित्र भार्गव यांनी एएनआयशी बोलताना सांगितलं आहे. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी महापौरांनी केली. त्यानंतर या घटनेची मध्य प्रदेश सरकारने गंभीर दखल घेत महापालिकेच्या दोन (पान २ वर)

## थोडक्यात

### सदानंद दाते राज्याचे नवे पोलिस महासंचालक



**मुंबई ।** राज्याच्या पोलीस महासंचालकपदी ज्येष्ठ पोलीस अधिकारी सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला येत्या ३ जानेवारीला सेवानिवृत्त होत असून त्यानंतर दाते पदभार स्वीकारणार असून त्यांचा दोन वर्षांचा कार्यकाल असेल. राज्याच्या गृह विभागाने आज याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. दाते यांनी मुंबई पोलिस दलात गुन्हे शाखा तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या सहआयुक्तपदाची जबाबदारी पार पाडली आहे. राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख म्हणूनही ते कार्यरत होते. तेथे असतानाच त्यांना महासंचालकपदी बढती मिळाली.


### शिक्षक भरती आता परीक्षा परिषदेकडे

**छत्रपती संभाजीनगर ।** राज्यातील शिक्षक पदभरतीची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदकडून केली जाणार आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाद्वारे पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरती प्रक्रिया होत होती. राज्य सरकारने आता सुकाणू समितीची स्थापना करत कामकाज परिषदेकडे सोपविण्याचा निर्णय घेतला. तर परिषदेमार्फत होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेतील अनियमितता, पेपरफुटी प्रकरणांची चर्चांमुळे सरकारच्या या निर्णयावर पात्रताधारकांमध्ये तर्क-वितर्क लावले जात आहेत. राज्यातील शिक्षक भरतीची प्रक्रिया २०१७ पासून पवित्र पोर्टलद्वारे राबविली जाते. शिक्षण आयुक्त कार्यालयाच्या नियंत्रणात प्रक्रियेचे कामकाज होते. परंतु, आता सरकारने ही जबाबदारी परिषदेवर सोपविण्याचा निर्णय मंगळवारी (३० डिसेंबर) घेतला. पदभरतीची कार्यवाही काहीशी वेळखाऊ प्रक्रिया असल्याचे सरकारने म्हटले आहे.

# खासदार संजय राऊत यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

वृत्तसंस्था । मुंबई

**शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांना बुधवारी अज्ञात व्यक्तीने बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली. या प्रकरणी कांजूरमार्ग पोलिसांनी आज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहेत.**



खासदार संजय राऊत कुटुंबियांसह भांडुप परिसरात वास्तवास आहेत. संजय राऊत घराबाहेर उभ्या असलेल्या एका मोटारगाडीवर अज्ञात व्यक्तीने बुधवारी त्यांना ठार मारण्याचा संदेश लिहिला होता. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या घराबाहेर एक मोटारगाडी उभी असून त्यावर मोठ्याप्रमाणात धूळ साचली आहे. या धुळीवरच संजय राऊत यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी लिहिण्यात आली होती. बुधवारीची रात्र संजय राऊत यांची शेवटची रात्र असेल, असे संदेशात नमूद करण्यात आले होते. एका कार्यकर्त्याने बुधवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास हा संदेश वाचल्यानंतर त्याने तत्काळ याबाबत कांजूरमार्ग पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि तपास सुरू केला. संजय राऊत यांच्या घरी बॉम्ब शोधक पथक आणि श्वान पथक दाखल झाले. या पथकांनी परिसरात शोधमोहीम राबवली. मात्र अद्याप कुठलीही संशयास्पद वस्तू सापडली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# पिंपरीत भाजप, शिंदेसेनेच्या ५ उमेदवारांचं चिन्ह गूल

## भाजपच्या ३ तर शिंदेसेनेच्या २ उमेदवारांचे एबी फॉर्म बाद

वृत्तसंस्था । पुणे

महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालचा शेवटचा दिवस होता. आज अर्जांची छाननी सुरु आहे. मुंबईतील दोन प्रभागांमध्ये महायुतीला धक्का बसला आहे. प्रभाग क्रमांक २११ आणि २१२ मध्ये आता महायुतीचे उमेदवार रिंगणात नाहीत. त्यानंतर आता पिंपरी-चिंचवडमध्येही भाजप आणि शिंदेसेनेला मोठा धक्का बसला आहे.पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रभाग २४ मधील तीन जागांवर भाजपच्या ३ उमेदवारांचे एबी फॉर्म बाद ठरवण्यात आले आहेत. तर



शिंदेसेनेच्या दोन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद झाले आहेत. त्यामुळे आता या पाचही उमेदवारांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी लागेल. त्यांना वेगळं चिन्ह देण्यात येईल. पक्षाचं अधिकृत चिन्ह त्यांना वापरण्यात येणार नाही.

शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रभागात स्वबळावर लढणाऱ्या दोन्ही पक्षांना मोठा फटका बसला आहे. अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर पाचही उमेदवारांनी एबी फॉर्म दाखल केले होते. त्यावर विरोधी उमेदवारांनी आक्षेप नोंदवला आहे. त्यामुळे छाननी प्रक्रियेत एबी फॉर्म बाद ठरवण्यात आले. यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप(पान २ वर)

# मालेगावात एमआयएमचा अर्ज बाद झाल्याने इस्लाम पक्षाने उघडलं खाते

प्रतिनिधी । मालेगाव

**महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ६ मध्ये इस्लाम पक्षाच्या महिला उमेदवाराचा एकच अर्ज शिल्लक राहिल्याने त्यांचा बिनविरोध निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे इस्लाम पक्षाचे खाते उघडण्यात जमा आहे.**

प्रभाग क्रमांक सहा (क) मध्ये इस्लाम पक्षाच्या मुनिरा फकिरा शेख मोहम्मद यांचा एकमेव अर्ज आता शिल्लक राहिला आहे. प्रतिस्पर्धी एमआयएम पक्षाच्या चुकीमुळे ही घडामोड घडली असून ती इस्लाम पक्षाच्या पथ्यावर पडली आहे. आपल्या पक्षाच्या महिला उमेदवार बिनविरोध झाल्याचे जाहीर होणे ही आता केवळ औपचारिकता राहिल्याने इस्लाम पक्षाच्या छावणीत आनंदाचे भरते आले आहे.

मालेगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ७१४ अर्ज दाखल झाले होते. बुधवारी या अर्जांची छाननी पार पडली. छाननीत १५ अर्ज अवैध ठरविण्यात आले असून, ६९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. यानंतर निवडणूक प्रक्रियेतील अर्ज माघारीच्या टप्प्यानंतर प्रत्यक्ष निवडणूक लढतींचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. छाननीत विविध कारणांमुळे १५ अर्ज अवैध ठरविण्यात आले. प्रभाग क्रमांक १५ (ब) मधील एमआयएम पक्षाच्या उमेदवार फिरदौस अय्याज मोहम्मद यांचा अर्ज अवैध ठरविण्यात आला. फिरदौस या ठेकेदार असल्याचा आक्षेप समाजवादी पक्षाचे शहराध्यक्ष मुस्तकिम डिग्निटी यांनी घेतला होता. त्यामुळे या ठिकाणी समाजवादी पक्षाच्या उमेदवारासमोर काही अपक्ष उमेदवार आता राहिले आहेत. याशिवाय उमेदवार किंवा प्रस्तावकाचे मतदार यादीत नाव नसणे, जात वैधता प्रमाणपत्र पुरावा सादर न करणे, यासारख्या कारणांमुळे उमेदवारी अर्ज अवैध ठरविण्यात आले आहेत. अर्ज छाननीनंतर आता उमेदवारी माघारीचा टप्पा महत्त्वाचा ठरणार असून, त्यानंतर अंतिम उमेदवारांची संख्या निश्चित होणार आहे. दरम्यान, काही प्रभागांत बिनविरोध निवडीची शक्यता वर्तवली जात असली तरी बहुतांश प्रभागांत चुरशीच्या लढती पाहायला मिळणार असल्याचे चित्र आहे. प्रभाग ६ (क) मध्ये मुनिरा शेख व अपक्ष शाहीना बानो सलीम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

### मुख्याध्यापक महासंघाचा व्यवस्थापनावर बहिष्काराचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर ।** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच चर्चेत आली आहे. परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल, परीक्षा हॉलमध्ये सीसीटीव्ही निर्णयाला मुख्याध्यापक संघाने विरोध केला.

सीसीटीव्हीसाठी सरकारने अनुदान द्यावे तर कर्मचारी अदलाबदल शिक्षकांवर अविश्वास व्यक्त करणारा निर्णय असल्याचे सांगत परीक्षेवर परीक्षेचे व्यवस्थापन इतर यंत्रणेकडून करून घ्यावे, परीक्षा संचलनात मुख्याध्यापक सहभागी होणार नाहीत असा ईशारा मुख्याध्यापक महासंघाने दिला आहे. राज्य मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी, बारावी परीक्षांची तयारी सुरू आहे. बारावीच्या परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे.

# तारिक रहमान यांना दिलं पंतप्रधान नरेंद्र मोदींचं पत्र



वृत्तसंस्था । ढाका

**बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलिदा जिया यांचं मंगळवारी निधन झालं. त्या बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान होत्या, आज (बुधवार) त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सन्मानपूर्वक सुपुर्द ए खाक अर्थात त्यांचा दफनविधी करण्यात आला. खलिदा जिया यांच्या अंत्ययात्रेत भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. त्यांनी खलिदा जिया यांचा मुलगा तारिक रहमान यांची भेट घेतली. त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लिहिलेलं पत्र दिलं.**

'तारिक रहमान तुमच्या आई आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या अध्यक्षा खालिदा जिया यांच्या निधनाचं वृत्त ऐकून मला वेदना झाल्या. मी तुम्हाला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करतो. माझ्या संवेदना तुमच्यासह आणि तुमच्या कुटुंबासह आहेत. देव खालिदा जिया यांच्या आत्म्यास शांती देवो.' असं पत्र पंतप्रधान मोदी यांनी तारिक रहमान यांना लिहिलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले खालिदा जिया आणि माझी भेट २०१५ मध्ये झाली होती. त्यांच्याशी झालेल्या चर्चा मला आजही स्मरणात आहेत. दृढ विश्वास असलेल्या अनन्यसाधारण नेत्या अशी त्यांची ओळख होती. बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा बहुमान त्यांना लाभला. त्यांनी बांगलादेशच्या विकासासाठी काम केलं. तसंच भारत आणि बांगलादेश यांच्यातले परस्पर संबंध दृढ व्हावेत, यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या पत्रात म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी पत्रात म्हणाले, खालिदा जिया यांच्या निधनामुळे एक प्रकारची रिक्तता निर्माण झाली आहे. त्यांचा दृष्टिकोन आणि वारसा कायम जिवंत असेल. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी ही तुमच्या (तारिक रहमान) नेतृत्वात जोमाने वाटचाल करेल. भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधांना एक नवी दिशा मिळेल असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

# राजकीय गुन्हेगारांचे नातेवाईकही उमेदवार

## नाशिकमध्ये कलंकित चेहऱ्यांना भाजपसह सर्वच राजकीय पक्षांची पसंती

प्रतिनिधी । नाशिक

**येथील महापालिका निवडणुकीत साम-दाम-दंड या त्रिसूत्रीचा वापर भाजपसहित सर्वच राजकीय पक्षांकडून होत असल्याचे उमेदवारी जाहीर झाल्यापासून दिसत आहे. एरवी नाशिकमधील वाढत्या गुन्हेगारीविषयी चिंता व्यक्त करणारे राजकीय पक्ष निवडणुकीत मात्र गुन्हेगारांच्या दावणीला बांधले जातात. नाशिक महापालिका निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या सर्वपक्षीय उमेदवारांच्या यादीत असे अनेक कलंकित चेहरे आहेत.**




गुन्हेगारांची मदत घेतल्याशिवाय आपणास जणूकाही निवडणूक जिंकणे शक्यच नाही, असा समज सर्वच राजकीय पक्षांचा झालेला दिसतो. मागील काही महिन्यांपासून नाशिक पलिसांनी जीवतोड मेहनत घेत राजकीय पक्षांशी संबंधित अनेक गुन्हेगारांना सळो की पळो करुन सोडले. त्यापैकी अनेक जण अजूनही कारागृहात आहेत. नाशिक पोलिसांनी राजकीय गुन्हेगारांचे वाभाडे काढले असतानाही राजकीय पक्षांना मात्र त्यांचे सख्य प्रिय असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे नाशिककरांची आता खरी परीक्षा आहे. गुन्हेगारांशी संबंधित उमेदवारांना निवडून द्यावयाचे की निष्कलंक उमेदवारांच्या पाठीशी राहावयाचे, याचा निर्णय नाशिकच्या मतदारांना घ्यावयाचा आहे. नाशिक शहरात हत्या, लूटमार, खंडणी, वाहनांची जाळपोळ, हाणामारी अशा घटनांनी कळस गाठल्यावर पोलिसांच्या ढिम्मपणाविषयी उघडपणे नाराजी व्यक्त होऊ लागली. गुन्हेगार बिनधास्तपणे दिवसाढवळ्या तलवारी, चाकू, कोयते घेऊन फिरत असताना पोलिसांकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने नाशिकच्या नागरिकांमध्ये पोलिसांविषयी कमालीचा संताप निर्माण झाला होता. त्याविषयी सर्वच स्तरातून पोलिसांच्या निष्क्रियतेचा निषेध होऊ लागल्यावर अखेर शहर पोलिसांनी कात टाकली. थंडपणाचे घोंगडे बाजूला फेकत नाशिक पोलीस सक्रिय झाले. (पान २ वर)

# गोलाणी मार्केटमध्ये भरदिवसा तरुणाचा खून

## ● कर्तव्यदक्ष पोलिसाच्या समयसूचकतेचे शहरात कौतुक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या गोलाणी मार्केट परिसरात बुधवारी भरदुपारी १८ वर्षीय तरुणावर चाकूने वार करून त्याचा खून केल्याची घटना बुधवारी दुपारी २.२० वाजेच्या सुमारास घडली. यावेळी कामानिमित्त मार्केटमध्ये आलेल्या एका पोलिसाला आरोपी वार करताना दिसताच त्याने झडप घालून आरोपीला पकडून शहर पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेची शहर पोलिसात रात्री उशीरापर्यंत नोंद करण्याचे काम सुरूच होते.**





बुधवारी दुपारी सुमारे २.२० वाजेच्या सुमारास गोलाणी मार्केटच्या गुरुनानक मोबाईल शॉपी समोरील वाहनतळाजवळ जुन्या वादातून एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला यात उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. साई गणेश बोराडे (वय-१८, रा.शंकरराव नगर, जळगाव) असे मृत तरुणाचे नाव असून तो देवकर महाविद्यालयात डिप्लोमाचे शिक्षण घेत होता. संशयित आरोपी शुभम रवींद्र सोनवणे (वय-२५, रा.चौगुले प्लॉट, जळगाव) याच्याशी साईचे पूर्वीपासून वाद होते. बुधवारी सकाळीही दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाल्याची माहिती आहे.

दुपारी साई बोराडे गोलाणी मार्केट परिसरात आला असता, तेथे आलेल्या शुभम सोनवणे याने साईला पाहताच चाकू काढून त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपीने साईच्या उजव्या तसेच डाव्या बाजूला चाकूचे वार केल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. गजबजलेल्या बाजारपेठेत दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

जखमी साई बोराडे याला नागरिकांच्या मदतीने प्रथम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करून नंतर खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना सायंकाळी ५.३० वाजता त्याचा मृत्यू झाला.

साईच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला होता. यावेळी तणाव निर्माण झाला होता. या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक सागर शिंपी व त्यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. साई बोराडे यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, शहरासह जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

**■ पोलिसाच्या प्रसंगावधानाचे सर्वत्र कौतुक**

गोलाणी परिसरात घडलेल्या गंभीर घटनेत एमआयडीसी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष हवालदार रमेश बाबुलाल चौधरी यांनी दाखवलेले धाडस अत्यंत कौतुकास्पद आहे. हल्लेखोर आरोपी हातात धारदार शस्त्र घेऊन उभा असताना क्षणाचाही विलंब न करता त्यांनी त्याच्यावर झडप टाकत आरोपीला आपल्या कवेत घेतले. त्यांच्या या समयसूचक कृतीमुळे आरोपीकडून दुसरा वार होण्याआधीच मोठा अनर्थ टळला. स्वतःच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असूनही जखमी नागरिकाचा जीव वाचविणे हेच आपले प्रथम कर्तव्य मानून त्यांनी केलेला हा पराक्रम पोलिस दलाच्या शौर्याचे आणि कर्तव्यनिष्ठेचे जिवंत उदाहरण आहे. या धाडसी हस्तक्षेपामुळे घटनास्थळी असलेल्या नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला. या घटनेनंतर गोलाणी परिसरात हवालदार चौधरी यांच्या धैर्याचे आणि तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत असून, पोलिस दलाबाबत नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या घटनेत फिर्यादीवर वार करतांना हवालदार चौधरी यांनी आरोपीवर झडप घालून त्याला पकडले. परंतु जखमीचा अतिरक्तस्त्राव झाल्याने उपचारादरम्यान सायंकाळी ५.३० वाजता मृत्यू झाला.

# जिल्हाधिकारी घुगे यांनी घेतला पाणीपुरवठा योजनांचा आढावा



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांच्या प्रगती, गुणवत्ता व प्रत्यक्ष अंमलबजावणीचा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर आढावा घेण्यात आला.**

बैठकीत रावेर, चोपडा व यावल तालुक्यातील आदिवासी पाड्यांमध्ये पाणीपुरवठा योजना प्रत्यक्ष कार्यान्वित आहेत की नाही, याची स्थळनिहाय खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील शाळा व अंगणवाडी केंद्रांमध्ये नियमित व सुरक्षित पाणीपुरवठा होत आहे की नाही, याची तत्काळ तपासणी करून अहवाल सादर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले.

पाणीपुरवठ्यातील अडचणी, पाणीस्रोतांची स्थिती, भूजल उपलब्धता तसेच तांत्रिक बाबींच्या अनुषंगाने आवश्यक तातडीच्या उपाययोजना राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. 'हर घर नल, हर घर जल' या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी कामांची गुणवत्ता, कालमर्यादा व विविध यंत्रणांमधील समन्वयावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीला कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद जळगाव, विविध तालुक्यांतील उप अभियंते, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी तसेच भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भू-वैज्ञानिक उपस्थित होते.

# योगा चॅम्पियनशिपसाठी जान्हवी सोमाणीची निवड

प्रतिनिधी । जळगाव



**डॉ.उल्हास पाटील मेडिकल कॉलेज येथील बी.पी.टी. अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी जान्हवी दीपक सोमाणी हिची अखिल भारतीय विद्यापीठ योगा चॅम्पियनशिप साठी निवड झाली आहे.**

ही राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित स्पर्धा एसव्यासा विद्यापिठ बेंगळुरू येथे आयोजित करण्यात येणार आहे. योगाभ्यासातील सातत्य, शिस्तबद्ध सराव आणि उत्कृष्ट कौशल्याच्या बळावर जान्हवीने निवड चाचणीत उल्लेखनीय कामगिरी केली. विविध योगासनांतील संतुलन, लवचिकता आणि आत्मविश्वास यामुळे तिची या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला योग गुरू डॉ. अनिता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जान्हवीच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खा.डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील, सदस्या डॉ.केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, डॉ.अनिकेत पाटील, डॉ.अक्षता पाटील, प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, प्रशासक अधिकारी राहुल गिरी यांच्यासह तसेच प्राध्यापकवर्ग, मार्गदर्शक प्रशिक्षक तसेच मित्रपरिवाराने अभिनंदन होत आहे.

तिच्या या निवडीमुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून विद्यार्थीवर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. अखिल भारतीय स्तरावर होणाऱ्या या स्पर्धेत जान्हवी दीपक सोमाणी उत्कृष्ट कामगिरी करून जळगाव व महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेले ९१ जण १५ दिवसांसाठी हद्दपार

## ● मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कारवाई; इच्छुक उमेदवारांचाही समावेश

प्रतिनिधी । जळगाव

**शहर महानगरपालिका निवडणूक शांततेत आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न न निर्माण होता पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दल पूर्णपणे ॲक्शन मोडवर आले आहे. दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या ९१ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक आदेश काढत त्यांना तब्बल १५ दिवसांसाठी महापालिका क्षेत्राबाहेर हद्दपार करण्याची कारवाई करण्यात आली आहे.**



या कारवाईत सर्वाधिक कारवाई एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ३० जणांवर करण्यात आली आहे.

निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाने आधीच सखोल नियोजन केले असून उपद्रवी, सराईत गुन्हेगार आणि संशयितांवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी, गुन्हेगारी टोळ्यांवर धडक कारवाई, तसेच प्रतिबंधात्मक आदेशांची अंमलबजावणी सुरू आहे. याच अनुषंगाने दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या ९१ जणांची यादी तयार करून त्यांच्यावर एकतर्फी हद्दपारीचे आदेश बजावण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, या हद्दपारीच्या यादीत काही इच्छुक उमेदवारांचाही समावेश असल्याचे समोर आले असून, त्यांच्यावरही ही कारवाई अटळ मानली जात आहे. त्यामुळे निवडणूक रिंगणातील काही चेहरे पोलिसांच्या थेट रडारवर असल्याचे स्पष्ट झाले आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्यांवर आणखी कडक कारवाई होण्याचे संकेतही पोलिसांकडून देण्यात आले आहेत. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ३० डिसेंबर हा शेवटचा दिवस असल्याने त्या दिवशी महापालिका परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. यामुळे महापालिका इमारत आणि परिसरात तिहेरी सुरक्षेचे कडेकोट नियोजन करण्यात आले आहे. १७ मजली इमारतीच्या पायथ्याशी, मुख्य प्रवेशद्वाराजवळ तसेच इमारतीच्या आत मोठ्या प्रमाणावर पोलिस तैनात राहणार आहेत. या बंदोबस्तासाठी स्वतः उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन गणापुरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, आरसीपीच्या दोन तुकड्या आणि मुख्यालयातील पोलिस कर्मचारी सज्ज ठेवण्यात आले असून, संपूर्ण शहरात कडक नजर ठेवली जाणार आहे.

**■ पोलिस ठाणेनिहाय हद्दपार**

एमआयडीसी पोस्टे अंतर्गत ३०, शनिपेठ पोस्टे अंतर्गत २२, जिल्हापेठ पोस्टे अंतर्गत १२, शहर पोस्टे अंतर्गत ११, रामानंदनगर पोस्टे अंतर्गत १० तर तालुका पोस्टे अंतर्गत ६ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

## पान १ वरुन

**भाजपचे राज्यभरात ७......**

उज्ज्वला रणजीत राजे भोसले यांची बिनविरोध निवड झाली. प्रतिस्पर्धी विरोधातले उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने उज्ज्वला भोसले या बिनविरोध निवडून आल्या. त्यांनी नुकतंच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातून भाजपात प्रवेश केला होता. धुळे महापालिकेतून भाजपच्या आणखी एका महिला उमेदवाराचा बिनविरोध विजय झाल्याची माहिती समोर येत आहे. धुळे महापालिकेत प्रभाग क्रमांक ६ ब मधून भाजपच्या ज्योत्सना प्रफुल्ल पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. प्रफुल्ल पाटील यांनी नुकतंच शिवसेना ठाकरे गटातून भाजपात प्रवेश केल्याची माहिती होती.

कल्याण डोंबिवली, धुळे पाठोपाठ आता पनवेल महापालिका निवडणुकीतही भाजपने आपल्या विजयाचं खातं उघडलं आहे. प्रभाग क्रमांक १८ ब मधून भाजपचे उमेदवार नितीन पाटील यांचा बिनविरोध विजय झाला आहे. नितीन पाटील यांच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाकडून एक उमेदवार होते. पण अर्ज छाननीत त्यांचा अर्ज बाद झाला. दुसरा कुठलाही उमेदवार नसल्याने नितीन पाटील यांचा बिनविरोध विजय झाला आहे.

**स्वच्छ शहर इंदूरमध्ये......**

अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केलं आहे.

'आरोग्य विभागाने अधिकृतपणे तीन जणांच्या मृत्यूची पुष्टी केली. मात्र, माझ्या माहितीनुसार, यामुळे झालेल्या मृत्यूंची एकूण संख्या ७ आहे. तसेच ३६ जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. दूषित पाणी प्यायल्याने एकूण ११६ पेक्षा जास्त लोक आजारी पडले होते', असं पुष्यमित्र भार्गव यांनी सांगितलं आहे.

'इंदूर महापालिकेचा आरोग्य विभाग लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी काम करत आहे. लोकांना चांगले उपचार मिळावेत आणि ते लवकर बरे व्हावे ही आमची प्राथमिकता आहे. आमची संपूर्ण पालिका घरोघरी जाऊन लोकांशी संवाद साधत आहे. पण घडलेल्या या दुर्दैवी परिस्थितीमुळे आम्ही सर्वजण खूप दुःखी आहोत. संपूर्ण पालिका लोकांपर्यंत पोहोचत आहे. तसेच लोकांना योग्य उपचार मिळत आहेत की नाही? याची देखील आम्ही खात्री करत आहोत. मुख्यमंत्र्यांनी देखील या घटनेची दखल घेतली आहे. तसेच मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपयांची मदत देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत अशी माहिती पुष्यमित्र भार्गव यांनी सांगितली आहे.

**राजकीय गुन्हेगारांचे......**

रस्त्यावर दिसू लागले. गुन्हेगारांना पकडून त्यांना पोलिसी खाक्या दाखवू लागले. त्यातून राजकीय पक्षांशी संबंधित गुन्हेगारही सुटले नाहीत. पोलिसांनी अचानकपणे धारण केलेल्या रुद्रावतारामुळे अनेकांना नाशिक शहरातून पळून जाणे भाग पडले. पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक भाजपसह सर्वच राजकीय पक्षांनी केले. परंतु, नाशिक महापालिकेसाठी जाहीर केलेल्या उमेदवारांमध्ये काही गुन्हेगार तर काही गुन्हेगारांशी संबंधित नातेवाईकांना उमेदवारी देण्यात आली आहे. सातपूरमध्ये गुन्हेगारीचे साम्राज्य उभे करणारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक प्रकाश लोंढे आणि त्याचे दोन्ही मुलगे दीपक आणि भूषण लोंढे कारागृहात आहेत. तरीही प्रकाश लोंढे आणि त्याची सून दीक्षा लोंढे यांनी जनसेवेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भाजपने अलीकडे प्रवेश केलेला वादग्रस्त नेता सुनील बागूल यांचा मुलगा मनिष बागूल भाजपचा उमेदवार आहे. .खूनाच्या गुह्यात कारागृहात असलेला भाजपचा माजी नगरसेवक उध्दव निमसे याचा मुलगा रिध्दिश आता भाजपचा उमेदवार आहे. सातपूरमध्ये दहशत निर्माण करणारा योगेश शेवरेची पत्नी मानसी शेवरे हिला भाजपने तिकीट दिले आहे. याबाबतीत भाजपला शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटानेही तोडीस तोड टक्कर दिली आहे. वादग्रस्त विक्रम नागरेची आई इंदूबाई नागरे यांना शिंदे गटाने उमेदवारी दिली आहे. सतत वादग्रस्त राहिलेला आणि अनेक गुन्हे दाखल असलेला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा पवन पवार पोलिसांच्या धाकाने नाशिकमधून पळालेला असला तरी त्याची आई आशा पवार मैदानात आहे. खासगी सावकारीमुळे वादग्रस्त आणि एकेकाळी छगन भुजबळ यांचा निष्ठावंत असलेला कैलास मुदलियार यास शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाने पावन करुन घेतले आहे. तो उमेदवार आहे. वादग्रस्त कैलास मैंदची पत्नी प्रमिलाही उमेदवार आहे. याशिवाय, कधीकाळी भाजपने विविध आरोप केलेले सुधाकर बडगुजर आणि दीपक बडगुजर ही पिता-पुत्राची जोडी भाजपकडून मैदानात आहे.

**पिंपरीत भाजप, शिंदेसेनेच्या......**

आणि शिंदेंच्या शिवसेनेला धक्का बसला आहे. या पाचही ठिकाणी भाजप, शिंदेसेनेच्या उमेदवारांना अपक्ष लढावं लागणार आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रम कलावंताची ओळख निर्माण करतात

## ● अनिल महाजन यांचे प्रतिपादन; सार्वजनिक विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**देशाच्या उज्वल परंपरा, संस्कृती आपल्या कलेद्वारे सादर करण्याचे ठिकाण म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन होय. याद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळत असून या माध्यमातून कलावंताची ओळख निर्माण होत असल्याचे मत सर्वोदय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अनिल महाजन यांनी व्यक्त केले.**



आसोदा येथील का. दा.भोळे प्राथमिक विद्यामंदिर व सार्वजनिक विद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे चेअरमन डिगंबर भोळे, सचिव विलास चौधरी यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे सदस्य सुनील चौधरी, गोपाळ भोळे, रत्नाकर महाजन, उद्धव पाटील, पंडित चौधरी, मुख्याध्यापक डॉ.मिलिंद बागुल, पर्यवेक्षक लालसिंग पाटील, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका पौर्णिमा भोळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शुभांगीनी महाजन, एल.जे. भुगवड्या, भावना चौधरी, जी.के. बारेला यांनी केले. परीक्षक म्हणून राजीव वानखेडे, आम्रपाली वानखेडे यांनी काम पाहिले.

**■ विद्यार्थ्यांनी सादर केले नृत्य...**

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, आदिवासी नृत्य, डोंबारी नृत्य, फनी डान्स, दक्षिणात्य संगीत, शेतकरी नृत्य, रिमिक्स गाण्यांवर आधारित नृत्य तसेच धार्मिक नृत्य सादर केले. या कार्यक्रमात पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# विद्यापीठ, आयसीआय यांच्यात सामंजस्य करार

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियाच्या जळगाव शाखेत दि.३० रोजी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू प्रा.व्ही.एल माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व आयसीआय चेअरमन सीए हितेश आगीवाल व कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्या स्वाक्षरीने हा सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी विद्यापीठाच्यावतीने सीए रवींद्र पाटील, प्रा.मधुलिका सोनवणे आदी उपस्थित होत्या. आयसीआयच्यावतीने सीए सोहन नेते, सचिव सीए लक्ष्मीकांत लाहोटी, कोषाध्यक्ष सीए हितेश जैन उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागात १ लाख २२ हजार एकल महिलांची नोंद

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मुख्य संकल्पनेतून करण्यात आलेल्या एका विशेष सर्वेक्षणातून जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुमारे १ लाख २२ हजार एकल महिलांची नोंद झाली आहे.यात सर्वाधिक महिलांची नोंद जामनेर आणि रावेर तालुक्यात झाली आहे.**



एकल महिलांना मुख्य प्रवाहात आणून त्यांना आधार देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ग्रामीण भागात एकल महिलांचे सर्वेक्षण घेण्यात आले. जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी स्तरावर अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांच्या माध्यमातून हे विशेष सर्वेक्षण घेण्यात आले. ग्रामीण भागात एकल महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंत भदाणे यांच्या मदतीने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे प्रशिक्षण घेऊन सर्वेक्षण कशा प्रकारे करावे या बाबत सूचना केल्यानंतर १० डिसेंबर ते २५ डिसेंबर या कालावधीत जिल्हाभरात हे सर्वेक्षण घेण्यात आले. यामध्ये १ लाख २२ हजार ६३ इतक्या एकल महिलांची नोंद झाली आहे.सर्वेक्षण करण्यासाठी गुगल फॉर्मच्या मदतीने ऑनलाईन सर्वेक्षण घेण्यात आले.

> "जिल्ह्यातील एकल महिलांना सन्मानाने जगता यावे, त्या स्वतःच्या पायावर उभ्या रहाव्यात, यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले. या महिलांचे केवळ सर्वेक्षण करणे नव्हे तर उमेद अभियानाच्या माध्यमातून या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा या मागचा हेतू आहे. या माध्यमातून आम्ही एकल महिलांच्या कौशल्य विकासावर आणि रोजगारावर विशेष लक्ष केंद्रित करणार आहोत.
>
> **-मिनल करनवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव**

**■ सर्वेक्षणात** अमळनेर तालुक्यात ९५४९, एरंडोल तालुक्यात ६९२१, चाळीसगाव तालुक्यात ११११९२, चोपडा तालुक्यात ८९९९, जळगाव तालुक्यात ८०४०, जामनेर तालुक्यात १५१६२, धरणगाव तालुक्यात ४९७५, पाचोरा तालुक्यात ७८१५, पारोळा तालुक्यात ७८६४, बोदवड तालुक्यात ३४१२, भडगाव तालुक्यात ६५३६, भुसावळ तालुक्यात ४७०३, मुक्ताईनगर तालुक्यात ६२९९, यावल तालुक्यात ८४००, रावेर तालुक्यात १२१९५ एकल महिलांची नोंद करण्यात आली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# प्रभाग १, ६ च्या दोन्ही जागा बिनविरोध ही तर सुरवात : आ.अग्रवाल

## उमेदवार उज्ज्वला भोसले, ज्योत्स्ना पाटील, रणजित भोसले, प्रफुल्ल पाटलांचा सत्कार

प्रतिनिधी । धुळे

**येथील महापालिकेच्या निवडणुकीत प्रभाग १ अ मधील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार उज्ज्वला रणजित भोसले व प्रभाग ६ ब मधील ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील यांची उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेवेळीच एकमेव अर्ज शिल्लक राहिल्याने बिनविरोध निवड स्पष्ट झाली आहे. दोन्ही महिला उमेदवारांचा बिनविरोध विजय भाजपसाठी शुभसंकेत असून, ही तर सुरवात आहे. येत्या दोन दिवसांत भाजपच्या आणखी आठ ते दहा जागा बिनविरोध होण्याची अपेक्षा आहे, असा विश्वास आमदार अनुप अग्रवाल यांनी व्यक्त केला.**

भाजपच्या प्रभाग एकमधील उमेदवार उज्ज्वला भोसले व प्रभाग सहामधील उमेदवार ज्योत्स्ना पाटील यांची बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आज रणजित भोसले व त्यांच्या पत्नी उज्ज्वला भोसले तसेच प्रफुल्ल पाटील व त्यांच्या पत्नी ज्योत्स्ना पाटील यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनी आज आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयात त्यांची भेट घेतली, त्यावेळी आमदार अग्रवाल बोलत होते. यावेळी भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, माजी नगरसेविका भारती माळी, पक्षाचे जिल्हा सरचिटणीस सुनील कपील, पवन जाजू, देवपूरचे मंडळाध्यक्ष प्रथमेश गांधी, विजय वाघ, भाजप कामगार आघाडीचे विजय पवार आदी उपस्थित होते.

यावेळी आ.अग्रवाल व श्री. अंपळकर यांनी विजयी उमेदवार उज्ज्वला भोसले व रणजित भोसले तसेच ज्योत्स्ना पाटील व प्रफुल्ल पाटील यांचा पुष्पगुच्छ देत सत्कार केला. कार्यकर्त्यांनी यावेळी जोरदार जल्लोष करत विजयाचा आनंदोत्सव साजरा केला. तसेच घोषणाबाजी करत कार्यालय परिसर दणाणून सोडला.

आमदार अग्रवाल म्हणाले, की धुळे महापालिकेच्या निवडणुकीत आज उमेदवारी अर्जांच्या छाननी प्रक्रियेवेळीच भाजपच्या प्रभाग एकच्या उमेदवार उज्ज्वला भोसले व प्रभाग सहाच्या उमेदवार ज्योत्स्ना पाटील या बिनविरोध विजयी झाल्याचे स्पष्ट झाले. अर्ज माघारीसाठी अजून दोन दिवस आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष असलेल्या रणजित भोसले व शिवसेनेचे (उबाठा) महानगर उपप्रमुख प्रफुल्ल पाटील यांच्यासारखे जनतेत राहून काम करणारे सच्चे आणि प्रामाणिक कार्यकर्ते आम्हाला मिळाले. त्यांचा आठ दिवसांपूर्वीच भाजपमध्ये प्रवेश झाला. आज उज्ज्वला भोसले व ज्योत्स्ना पाटील यांची बिनविरोध निवड होणे हा शुभसंकेत आहे. यासाठी भोसले व पाटील दाम्पत्याचे खूप-खूप अभिनंदन करतो. शहराचा सर्वांगीण विकास हेच आमचे एकमेव लक्ष्य आहे. या विकासाचे दरवाजे महापालिकेच्या माध्यमातून खुलतात. त्या महापालिकेच्या निवडणुकीत छाननीच्या दिवशीच आमचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शहर विकासासाठी तेही भाजपसोबत येतील.





### ■ पक्षकार्यासह प्रभागाच्या विकासाला चालना देईन...

भाजपने आम्हाला पक्षात प्रवेश देत प्रभाग सहामधून उमेदवारीही दिली. आज छाननीच्या दिवशीच माझ्या विरोधातील अन्य उमेदवारांनी माघार घेतल्याने माझी बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, माझ्या प्रभागातील भाजपचे अन्य तीन उमेदवारही जोपर्यंत विजयी होत नाहीत, तोपर्यंत माझा विजय अपूर्ण आहे. ते विजयी झाल्यानंतरच आम्ही खरा जल्लोष करू. या विजयात पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी मंत्री डॉ.सुभाष भामरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, माजी आमदार कुणाल पाटील यांचा मोलाचा वाटा असून, या सर्व नेत्यांच्या नेतृत्वात पक्षकार्यासह प्रभागाच्या विकासाला चालना देईन.

**– ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील,**
**बिनविरोध विजयी उमेदवार, प्रभाग ६**

### ■ संधी दिल्यानेच आजचा विजय सुकर

धुळे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने प्रभाग क्रमांक एकमधून उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत आज माझी अर्ज छाननीवेळीच बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यासाठी पालकमंत्री जयकुमार रावल, धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल व भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचे मनापासून आभार मानते. त्यांनी ही संधी दिल्यानेच आजचा विजय सुकर झाला आहे.

**– उज्ज्वला रणजित भोसले,**
**बिनविरोध विजयी उमेदवार, प्रभाग १**

**जनता भाजपच्या पाठीशी**

श्री. अग्रवाल म्हणाले, की माघारीअंती भाजपचे आणखी आठ ते दहा उमेदवार बिनविरोध विजयी होतील, अशी अपेक्षा आहे. कारण शहराच्या विकासासाठी भाजपच सक्षम आहे, याची विरोधातील उमेदवारांनाही खात्री आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शहरवासीय भाजपच्या पाठीशी आहेत. आमच्या पक्षात कोणीच नाराज नाही. जे आमच्या पक्षात दाखल झाले होते. त्यांना गेल्या निवडणुकीत उमेदवारी देऊन नगरसेवकही बनविले होते. मात्र, त्यांचे काम व्यवस्थित नसल्याने त्यांना आता वगळण्यात आले. तेच आता अन्य पक्षात गेले आहेत. पक्षाच्या विचारांशी बांधिलकी असलेले कार्यकर्ते आजही भाजपमध्येच आहेत. त्यांची असलेली नाराजी दूर करण्याचा नक्कीच प्रयत्न करू. त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चाही करू.

श्री. भोसले, म्हणाले, की भाजपचे नेते तथा पालकमंत्री जयकुमार रावल, आ.अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी आमदार कुणाल पाटील आदी नेत्यांच्या नेतृत्वात भाजपमध्ये प्रवेश घेतला आणि आज अर्ज छाननी प्रक्रियेवेळीच माझी पत्नी उज्ज्वला भोसले बिनविरोध निवडून येणार असल्याचे स्पष्ट झाले, याचा खूप आनंद आहे. यापुढे भाजपच्या विचारांशी एकनिष्ठ राहून सर्वसामान्य जनतेसाठी काम करू. पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही पुरेपूर प्रयत्न करू, याची ग्वाही देतो.

श्री. पाटील म्हणाले, की माझी पत्नी यापूर्वी दोन वेळा नगरसेविका म्हणून विजयी झाली. मात्र विरोधी पक्षात असल्याने विकासकामे करता येत नव्हती. अनुपभय्या अग्रवाल आमदार झाल्यानंतर त्यांनी मला माझ्या प्रभागात विकासकामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला.



## ● निधन वार्ता

### विमलबाई चौधरी आज अंत्ययात्रा



**जळगाव** । येथील ढाकेवाडी पंचमुखी हनुमान मंदिरामागील रहिवासी व जळगाव शहर तेली समाज पंच मंडळाचे सचिव कैलास चौधरी यांच्या मातोश्री विमलबाई लोटन चौधरी. (वय ८०) यांचे बुधवार, दि. ३१ डिसेंबर रोजी संध्याकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. १ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता नेरीनाका स्मशानभूमीकडे निघणार आहे. त्यांचे पश्चात ३ मुले, २ मुली, जावई, सुना, नातवंडे, नातजावई, पतवंडे असा परिवार आहे. संतांजी जगनाडे महाराज बहुउद्देशीय संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अशोक चौधरी व सुनिल चौधरी यांच्या त्या मातोश्री होत.

# महापालिका उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटच्या दिवशी गर्दी

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अनेकांनी शक्तीप्रदर्शन करुन अर्ज दाखल केला. महापालिकेने सहा ठिकाणी अर्ज दाखल करण्यासाठी कार्यालय सुरु केले होते. या सहा ठिकाणी प्रचंड गर्दी झाली होती. त्यामुळे प्रशासनाने बॅरिगेट्स लावून रस्ता बंद केला होता. त्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली होती.**



दि. २३ डिसेंबरपासून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली होती. परंतु, २६ तारखेपर्यंत एकाही इच्छुकाने अर्ज दाखल केला नव्हता. त्यानंतर २७ व २९ डिसेंबरला काही इच्छुकांनी अर्ज दाखल केले. शेवटच्या दिवशी अधिकृत पक्षांकडून इच्छुकांनी एबी फॉर्म देत नामनिर्देशनपत्र दाखल केले. अर्ज दाखल करण्यापूर्वी काहींनी शक्तीप्रदर्शनही केले. अर्ज दाखल करण्याच्या ठिकाणी प्रचंड गर्दी झाली होती. त्यामुळे उमेदवारांनाच आतमध्ये सोडण्यात आले.

उमेदवारांच्या समर्थकांना पोलिसांनी बाहेरच रोखले. रस्ते बॅरिगेट्स लावून बंद करण्यात आले होते. शेवटच्या दिवशी अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी झाल्याने प्रशासनाची तारांबळ उडाली. प्रशासनाने गर्दी होईल हे लक्षात घेवून योग्य ते नियोजन केले होते.

मुख्य निवडणूक अधिकारी नितीन कापडणीस हे परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. वेळोवेळी त्यांनी सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांना सूचनाही केल्या. दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची मुदत होती. या मुदतीत इच्छुकांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत.

# शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड वाटप

प्रतिनिधी । शिरपूर

तालुक्यातील उंटावद येथे मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानातंर्गत शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड वाटप करण्यात आले. उंटावद ग्रामपंचायततर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातंर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अभियानाला गावात चांगला प्रतिसाद देखील मिळत आहे. विविध उपक्रमात ग्रामस्थांचा सहभाग लाभत आहे.या अभियानाचा भाग म्हणून ग्रामपंचायतीत राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानातंर्गत गावातील शेतकऱ्यांना मृदा आरोग्य कार्ड वाटप करण्यात आले. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम कृषी अधिकारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेत भाजपा स्वतंत्र निवडणूक लढविणार

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेच्या निवडणुकीत युती फिस्कटली असून भारतीय जनता पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढविणार आहे. तर शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार राष्ट्रवादी गट हे एकत्रितपणे मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.** भाजपाने ७४ पैकी ६३ जागा स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला असून भाजपातर्फे निश्चित झालेल्या उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले आहे. ३१ पुरुष आणि ३२ महिला भाजपाने मैदानात उतरविल्या आहेत, अशी माहिती भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी दिली आहे. भाजपाकडे ५५० इच्छुकांनी मुलाखती दिल्या होत्या. त्यामुळे उमेदवारी देण्यासाठी प्रचंड रस्सीखेच भाजपामध्ये दिसून आली.

# आदिवासी विद्यार्थिनीवरील लैंगिक शोषण प्रकरणात आरोपी नव्हे तर संपूर्ण व्यवस्था अपयशी

### ● आरोपी फरार कसा? पोलीस तपास की पोलीस संरक्षण : युवा क्रांतीचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. रुपसिंग वसावे

प्रतिनिधी । धडगाव

**शासकीय आश्रमशाळा तलाई (ता. धडगाव) येथील आदिवासी विद्यार्थिनीवरील लैंगिक शोषण, जीवे ठार मारण्याच्या धमक्यांच्या गंभीर आरोपांबाबत समोर आलेला संपूर्ण घटनाक्रम अभ्यासल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की ही घटना केवळ एका शाळेपुरती मर्यादित नसून, आदिवासी विकास विभाग, पोलीस प्रशासन, शालेय यंत्रणा आणि एकूणच शासनाच्या संवेदनशीलतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. प्रत्यक्ष पाहणी न करता देखील उपलब्ध कागदपत्रे, एफआयआर मधील मजकूर, पालकांचे म्हणणे, प्रशासकीय हालचाली आणि अधिकाऱ्यांची भूमिका यांचा सखोल अभ्यास केला असता, याात केवळ आरोपी व्यक्ती नव्हे तर संपूर्ण व्यवस्था अपयशी ठरल्याचे चित्र समोर येते, असा आरोप युवा क्रांतीचे प्रदेशाध्यक्ष अ‍ॅड. रुपसिंग वसावे यांनी केला आहे.**

गेल्या दीड ते दोन वर्षांपासून एका अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनीवर तिच्याच शाळेतील मुख्याध्यापकाकडून सातत्याने लैंगिक शोषण व बलात्कार झाल्याचे आरोप अत्यंत गंभीर आहेत. ही घटना घडत असताना आरोपीने आपल्या पदाचा, अधिकाराचा आणि भीतीचा वापर करून पीडित मुलीला गप्प ठेवले, धमकावले आणि मानसिक गुलामगिरीत ढकलले. पालकांनी तक्रार केल्यानंतरही प्रशासकीय यंत्रणा तत्काळ हलली नाही. हा या प्रकरणातील सर्वात गंभीर आणि लाजिरवाणा भाग आहे. आदिवासी विकास विभागाने चालवलेल्या आश्रमशाळेत शिकणाऱ्या मुली सुरक्षित नसतील तर मग शासनाच्या आदिवासी कल्याण या संकल्पनेचा अर्थ काय? असा प्रश्न उपस्थित होतो.

तक्रार मिळाल्यानंतरही प्रकल्प अधिकारी स्तरावर केवळ कागदी चौकशी करून वरिष्ठ कार्यालयांकडे फाईल ढकलण्यात आली. इतक्या गंभीर स्वरूपाच्या आरोपांमध्ये तात्काळ,एफआयआर दाखल करणे, वैद्यकीय तपासणी करणे, आरोपीला निलंबित करणे आणि पीडितेला संरक्षण देणे हे कर्तव्य असताना, त्या सर्व बाबींमध्ये दिरंगाई करण्यात आली. ही दिरंगाई निष्काळजीपणाची आहे की जाणीवपूर्वक केलेली टाळाटाळ आहे? हा प्रश्न आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारा आहे. जेव्हा गुन्हा अखेर नोंदवला गेला, तेव्हाही आरोपी अद्याप फरार आहे. अटक झालेली नाही आणि तपास प्रक्रियेबाबत केवळ लवकरच होईल, अशी गोलमोल उत्तरे दिली जात आहेत.पोलीस प्रशासनाची भूमिका देखील निराशाजनक आहे. ज्या जिल्ह्यात आंदोलन, तोडफोड किंवा सार्वजनिक दबाव निर्माण झाला की काही तासांत मोठ्याप्रमाणावर अटकसत्र राबवले जाते, त्याच जिल्ह्यात एका अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनीवरील बलात्कार प्रकरणात आरोपी सरकारी कर्मचारी असल्यामुळे अटक करण्यात विलंब होत असेल तर हा दुजाभाव नाही तर काय? कायदा सर्वांसाठी समान आहे का की पद ? ओळखी आणि राजकीय आश्रय असल्यास कायद्याचे दात बोथट होतात, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होतो.

या प्रकरणात शाळेतील काही शिक्षक, अधीक्षिका आणि इतर कर्मचाऱ्यांची भूमिका देखील संशयास्पद आहे. घटना घडली नसल्याचे सांगणे, गावपंच बसवण्याचे प्रयत्न होणे, तडजोडीच्या चर्चा, पैशांची ऑफर, पालकांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न – या सर्व बाबी घटना घडल्याचे अप्रत्यक्षपणे अधोरेखित करतात. जर काहीच घडले नसते, तर मग प्रकरण मिटवण्याची गरज का भासली? हे प्रश्न केवळ प्रशासनालाच नव्हे तर समाजालाही आत्मपरिक्षण करायला लावणारे आहेत.

# एसटी आरक्षणासाठी धनगर समाजाचे राज्यव्यापी आंदोलन

प्रतिनिधी । धुळे

**धनगर समाजाचा एसटी आरक्षणासाठी सुमारे आठ दशकांपासून लढा सुरू आहे. हा लढा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, दि. २१ जानेवारी रोजी मुंबईतील आझाद मैदानावर राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती धनगर समाजाचे नेते दीपक बो–हाडे यांनी धुळ्यात पत्रकार परिषदेत दिली.**

आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी आतापर्यंत समाजातील अनेकांनी बलिदान दिले, शेकडो समाजबांधवांनी उपोषणे केली, तर हजारो जणांवर गुन्हे दाखल झाले. मात्र तरीही सरकारकडून ठोस निर्णय होत नसल्याचा आरोप बोऱ्हाडे यांनी केला. सरकारला जाग आणण्यासाठी आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनात येळकोट येळकोटचा गजर करीत धनगर समाज बांधवांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.




शहरातील साक्री रोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी विठ्ठल मारनर, पंडित मदने, आप्पा खताळ, गोपाल माने, देविदास पाकळे, विनोद खेमनर, लखन गोराड, गणेश गर्दै, भगवान गर्दै, अशोक गिळे, गुलाब सुपनर, सुनील परदेशी आदी उपस्थित होते.

बोऱ्हाडे यांनी सांगितले की, धनगर समाजाला एसटी आरक्षण मिळावे, यासाठी गेल्या आठ दशकांपासून लढा सुरू असून २०१४ मध्ये सत्तेवर आल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आरक्षणाच्या अंमलबजावणीचे आश्वासन दिले होते. मात्र या आश्वासनाचा सरकारला विसर पडला आहे. राज्यात सुमारे दोन कोटी, तर देशात २० ते २५ कोटी इतकी लोकसंख्या असतानाही समाजाला अपेक्षित राजकीय प्रतिनिधित्व मिळालेले नाही, असेही बोऱ्हाडे यांनी नमूद केले.

जालना जिल्ह्यात दोन ते अडीच लाख धनगर समाज बांधव असतानाही नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांत एकही उमेदवारी न मिळाल्याचा दाखला देत, हा प्रश्न केवळ राजकीय नसून संविधानाने दिलेल्या हक्कांचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे एसटी आरक्षण सर्टिफिकेट नाहीतर मतदान नाही अशी ठाम भूमिका समाजाने घेतल्याचेही त्यांनी सांगितले. पक्षीय भेद विसरून सर्व पक्षांतील नेते, लोकप्रतिनिधी व समाजसेवकांनी एकत्र येऊन आंदोलन यशस्वी करावे, समाजापेक्षा पक्ष मोठा नाही, असे आवाहन बो–हाडे यांनी केले.

# महापालिकेच्या निवडणुकीत १३१ उमेदवारी अर्ज बाद

## ● प्रभाग १ ते १५ पर्यंत छाननी पूर्ण; रात्री उशिरापर्यंत सुरू होती छाननी

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीसाठी १ हजार ३८ उमेदवारी अर्ज दाखल झाले असून बुधवारी अर्जांची छाननी पूर्ण झाली आहे. यात प्रभाग १ ते १५ प्रभाग पर्यंत १३१ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेला अर्ज छाननी प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया सायंकाळी साडेसातपर्यंत चालली. या छाननीत पंधरा प्रभागांमध्ये १३१ उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले, तर ६८५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले.**



चार प्रभागांची माहिती रात्री उशिरापर्यंत उपलब्ध होऊ शकली नाही. दरम्यान, निवडणूक निर्णय अधिकारी व महापालिका कर्मचाऱ्याचा समन्वय नसल्याने देखील निवडणूक प्रक्रियेचे कामकाज संथ सुरू असल्याचे दिसून चित्र होते. महापालिकेच्या दुसऱ्या मजल्यावर तसेच अकराव्या मजल्यावर उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते सकाळपासूनच मोठ्या संख्येने उपस्थित होते. अर्ज छाननीदरम्यान उमेदवारांनी आपले अर्ज वैध ठरावेत, यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली.

काही अर्जांवर विरोधी पक्षांनी हरकती नोंदविल्याने तणावाचे वातावरण काही क्षणही निर्माण झाले होते. ८५० उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याने प्रचाराची रणधुमाळी अधिक तीव्र होणार आहे. १५० अर्ज बाद झाल्याने काही प्रभागांमध्ये उमेदवारांची संख्या कमी झाली आहे. माघार व अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर मनपा निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. कोणत्या पक्षातील व उमेदवारांमध्ये लढत होणार हे चित्र स्पष्ट होणार आहे.

### ■ प्रभाग १२ ब मधून उज्वला बेंडाळे बिनविरोध...



जळगाव शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने विजयाचा श्री गणेशा केला आहे. जळगाव भाजपाच्या माजी महानगर जिल्हाध्यक्ष उज्वलाताई बेंडाळे या प्रभाग क्रमांक १२ ब मधून अखेर बिनविरोध झाले असून त्याबाबतची अधिकृत घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र कुंवर यांनी प्रभाग क्रमांक १२ मध्ये महायुती मधून भारतीय जनता पक्षाला चारही जागा मिळालेले आहेत. यात १२ मध्ये अ मधून अनिल अडकमोल, १२ ब मध्ये उज्वलाताई मोहन बेंडाळे, १२ क मधून गायत्री इंद्रजीत राणे, १२ ड मध्ये नितीन मनोहर बरडे यांना उमेदवारी मिळालेली आहे. दरम्यान बुधवारी दि. ३१ डिसेंबर रोजी महानगरपालिकेमध्ये दिवसभर छाननीचे काम सुरू होते. या छाननीअंती प्रभाग क्रमांक १२ ब मध्ये वैशाली निवृत्ती पाटील यांनी भारतीय जनता पक्षातर्फे तीन अर्ज भरले होते. मात्र कुठल्याही उमेदवाराला एकाच प्रभागात ३ अर्ज भरता येत नाही. तसेच भारतीय जनता पक्षाने वैशाली पाटील यांना एबी फॉर्म दिलेल्या नाही. तसेच वेळेच्या तांत्रिक मुद्द्यावर त्यांचा ब आणि ड मधील अर्ज बाद झाला.

# चोपड्याच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील यांचे आज पदग्रहण

## ● प्रथमच शिवसेनेचा नगराध्यक्ष होणार विराजमान

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपालिकेच्या इतिहासात एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे . शिवसेनेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील या गुरुवार दि.१ जानेवारी रोजी अधिकृतपणे नगराध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारणार आहेत. चोपडा नगरपालिकेत प्रथमच शिवसेनेचा नगराध्यक्ष विराजमान होत असल्याने या पदग्रहण सोहळ्याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे नम्रता पाटील या उच्चशिक्षित असून आजवरच्या सर्वांत तरुण नगराध्यक्ष ठरणार आहेत.**

पदग्रहण सोहळ्याची सुरुवात दि.१ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मुजुमदार गणपती मंदिरापासून होणार आहे. यानिमित्त वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार आहे. या कार्यक्रमाला आमदार प्रा. चंद्रकांतअण्णा सोनवणे, माजी आमदार लताताई चंद्रकांत सोनवणे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. संदीपभैया पाटील, डॉ.स्मिता पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच



कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पाटील, माजी सभापती सुरेशबापू पाटील, संचालक सांगोरे सर, ॲड. शिवराज पाटील, माजी उपनगराध्यक्ष विकास पाटील, उद्योजक रवींद्र पाटील, सचिन पाटील यांच्यासह अनेक माजी नगरसेवक, नवनियुक्त नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. यासोबतच मुख्याधिकारी रामनिवास झवर यांच्यासह नगरपालिका अधिकारी व कर्मचारीही या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार ठरणार आहेत. शिवसेनेच्या नगराध्यपदी नम्रता पाटील विराजमान झाल्याने शहराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# पारोळा येथे भरड धान्य, ज्वारी, मका खरेदीचा आ. अमोल पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

प्रतिनिधी । चाळीसगाव

**पारोळा शहरातील कासोदा रोडलगत असलेल्या शासकीय गोडाऊन येथे खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत भरड धान्य ज्वारी व मका खरेदीचा शुभारंभ आमदार अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.**



याप्रसंगी तहसिलदार डॉ. उल्हास देवरे, शेतकी संघाचे मा. अध्यक्ष चतुर भाऊसाहेब पाटील, विजु पाटील, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, शहरप्रमुख तथा नगरसेवक अमृत चौधरी, सहाय्यक निबंधक भाऊसाहेब महाले, पुरवठा अधिकारी शिवकुमार निरगुळे, शेतकी संघाचे अध्यक्ष भैय्यासाहेब पाटील, उपाध्यक्ष प्रकाश पाटील, संचालक साहेबराव पाटील, सुधाकर पाटील, भैय्यासाहेब पाटील, बबलू पाटील, प्रा.बी. एन. पाटील, शेतकी संघाचे माजी संचालक राजेंद्र पाटील, नगरसेवक पंकज मराठे, उमरे माजी सरपंच समाधान पाटील, आडगांव सरपंच महेश मोरे, मुंदाणे सरपंच एकनाथ पाटील, शेतकी संघाचे व्यवथापक भरत पाटील, शंतनू पाटील यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी व सदस्य, शिवसेना-युवासेनेचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत एकूण ४८८ शेतकऱ्यांनी नावनोंदणी पूर्ण केली असून, ज्वारीसाठी - ३१० शेतकरी मक्यासाठी १७८ शेतकरी. उत्पादकतेच्या दृष्टीने ज्वारी-१७ क्विंटल प्रति हेक्टर मका-२६ क्विंटल प्रति हेक्टर तर शासनामार्फत ज्वारीसाठी ३६९९ व मक्यासाठी २४०० असा हमीभाव निश्चित करण्यात आला आहे. गेल्या काळातील अस्मानी संकटांमुळे बळीराजा आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. अशा परिस्थितीत ही खरेदी प्रक्रिया शेतकऱ्यांना थोडा का होईना आधार देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी आ.अमोल पाटील यांनी व्यक्त केला.

## मुकेश अग्रवाल यांचे २ रोजी नहाटात मार्गदर्शन

**भुसावळ** । येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पू.ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य शाखेतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शुक्रवार, दि.२ रोजी व्यवसायिक अभ्यासक्रमातील (सीए, सीएस, सीएमए) संधी या विषयावर सुप्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट मुकेश अग्रवाल यांचा मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.डॉ. बी.एच. बऱ्हाटे तर प्रमुख अतिथी उपप्राचार्य प्रा.डॉ. डी.एन. पाटील, उपप्राचार्य प्रा.डॉ. जी.आर. वाणी, उपप्राचार्य प्रा.वाय.एम. पाटील, पर्यवेक्षिका प्रा. स्वाती पाटील उपस्थित राहणार आहेत.

# चाकूचा धाक दाखवत व्यापाराचे २४ लाख रुपये लुटले

## ● यावल-चोपडा रस्त्यावरील चुंचाळे फाट्याजवळील घटना; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । यावल

**भुसावळ येथील व्यापाऱ्याने चोपडा येथील व्यापाऱ्यांना दिलेले उसनवारीचे तब्बल २४ लाख रुपये घेऊन येणाऱ्या नोकराला चाकूचा धाक दाखवत लुटल्याची खळबळजनक घटना रविवारी दुपारी यावल-चोपडा रस्त्यावरील चुंचाळे फाट्याजवळ घडली. दुचाकीवर आलेल्या २० ते २२ वयोगटातील दोन अज्ञात तरुणांनी ही धाडसी लूट केल्याने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.**



प्रभात भुसावळ येथील कॉलनीत राहणारे किरण प्रभाकर पाटील (वय ५३) यांनी यावल पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत ही माहिती दिली आहे. किरण पाटील हे भुसावळ येथील व्यापारी राजेश पारीख यांच्याकडे खासगी नोकरी करतात. पारीख यांनी चोपडा येथील व्यापाऱ्यांकडे दिलेली उसनवारी परत आणण्याची जबाबदारी पाटील यांच्यावर सोपवली होती. त्यानुसार किरण पाटील हे आपल्या सी.डी.-१०० दुचाकीने (एमएच १९, डीडब्ल्यू ०५४७) चोपडा येथे गेले. चोपडा येथील महालक्ष्मी स्टील येथून ९ लाख ५० हजार, चामुंडा स्टील येथून ११ लाख आणि महाराष्ट्र स्टील येथून साडेतीन लाख रुपये असे एकूण २४ लाख रुपये त्यांनी एका बॅगमध्ये ठेवले. दुपारी पावणेतीन वाजेच्या सुमारास ते यावलच्या दिशेने निघाले. दरम्यान, दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास चुंचाळे ते साकळी दरम्यान चुंचाळे फाट्यापुढे सुमारे १०० मीटर अंतरावर समोरून एक सी.डी.-१०० दुचाकी विरुद्ध दिशेने आली. अपघात टाळण्यासाठी पाटील यांनी दुचाकी थांबवली असता, दुसऱ्या दुचाकीवरील दोन तरुणांनी त्यांच्या पाठीवर अडकवलेली पैशांची बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला. पाटील यांनी प्रतिकार केल्यावर त्यातील एकाने खिशातून चाकू काढून 'जान से मार दूंगा, बॅग दे' अशी धमकी दिली. त्यानंतर दोघांनी पैशांची बॅग जबरदस्तीने हिसकावून घेतली. याचवेळी पाटील यांच्या खिशातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल व दुचाकीची चावीही काढून घेऊन दोघे यावलच्या दिशेने दुचाकीवरून पसार झाले. थोड्याच वेळात मागून येणाऱ्या एका दुचाकीस्वाराने पाटील यांची दुचाकी सुरू करून दिली. त्यानंतर पाटील यांनी तात्काळ मालक राजेश पारीख यांना घटनेची माहिती दिली. पारीख हे यावल येथे आल्यानंतर दोघांनी यावल पोलीस ठाणे गाठून फिर्याद दाखल केली.

# भामरे येथील शेतशिवारातून ३२ हजारांच्या इलेक्ट्रीक तार चोरीस; पोलिसात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यातील भामरे येथील शेत शिवारातून महावितरणच्यो इलेक्ट्रीक पोल वर चढुन तब्बल ३० हजार रुपये किमतीच्या इलेक्ट्रीक अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या आहेत. ही घटना मंगळवार, दि.३० रोजी घडली असून याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हां दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत सविस्तर माहिती अशी की, समाधान आधार सावळे, (वय-५०) हे चाळीसगाव तालुक्यातील वाघळी-२ ग्रामीण कक्ष येथे लाईनमन या पदावर नेमणुकीस आहे. त्याना दि, २९ रोजी माहिती मिळाली की, भामरे शिवारातील रोहित्र क्रमांक ८१५०६८५ (१०० के.व्ही.) आमचे शेत गट नं. ५२ (२) व शेत गट क्रं ५४ (१) मधील इलेक्ट्रीक पोलवरील ॲल्युमिनिअमच्या तारा कोणीतरी पोलवर चढुन तोडुन चोरुन नेल्या आहेत. म्हणुन त्यांनी सदर ठीकाणी जावुन पाहीले असता तेथे इलेक्ट्रीक पोल वरील तारा दिसल्या नाहीत, लागलीच शेतकऱ्यासह तो परिसर पाहिला असता तेथील एकुण ८ इलेक्ट्रीक पोलवरील तार दिसत नसल्याने, गावात विचारपुस केली असता, वरील इलेक्ट्रीक पोलवरील ॲल्युमिनिअमच्या तारा कोणीतरी पोलवर चढुन तोडुन चोरुन नेल्या आहेत, अशी आमची खात्री झाल्याने आमचे वरिष्ठ दिपक प्रकाश महाजन, कनिष्ठ अभियंमता यांना वरप्रमाणे माहीती देवुन त्यांनी सदर घटनेबाबत तक्रार देण्याचे सांगितले. म्हणून एकूण ८ इलेक्ट्रीक पोलवरील ३२००० किंमतीचे जु.वा. कंपनीच्या सुमारे १.६ कि.मी लांबीच्या ५५ वर्ग लघु दाबाच्या ॲल्युमिनिअम तारा अज्ञात चोरट्यांने इलेक्ट्रीक पोलवर चढुन इलेक्ट्रीक तारा तोडुन, लबाडीच्या इराद्याने चोरुन नेल्या. याबाबत चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हां दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## भालोद शाळेच्या संघाचे क्रीडा महोत्सवात यश

**भालोद, ता.यावल** । रेल्वे मैदान भुसावळ येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय खासदार क्रीडा महोत्सवात इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेजच्या १७ वर्षांखालील व १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या व्हॉलीबॉल संघांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धेत येथील न्यू इंग्लिशस्कूलच्या १९ वर्षांखालील व्हॉलीबॉल मुलांच्या संघाने अंतिम फेरीत चोपडा येथील संघावर मात करत प्रथम क्रमांक पटकावला. तर १९ वर्षांखालील व्हॉलीबॉल मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवत शाळेचे नाव उज्ज्वलकेले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक आर.एस झांबरे यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे कौतुक होत आहे.

# आडळसे येथील एस.टी. बससेवा बंदमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

## ● बस सुरू करा; विद्यार्थी, पालकांकडून होतेय मागणी

प्रतिनिधी । भडगाव

**आडळसे गावाची एसटी सेवा बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान बरोबर ग्रामस्थांचे मोठे हाल होत असून ही बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थी व पालक, ग्रामस्थांनी गावाच्या ग्रामसभेत केली असून तसा ठराव करून तो चाळीसगाव एसटी आगार प्रमुख यांना पाठविण्यात आला आहे. यांची तात्काळ दखल घेण्यात यावी अशी मागणी होत आहे.**



आडळसे पोहरे रस्त्याचे काम सुरू असल्याने चाळीसगाव एसटी डेपोने आडळसे बस सेवा बंद केली आहे. या रस्त्याचे काम ५० टक्के झाले असून या रस्त्याने अवजड वाहने देखील जात येत आहे मात्र, बंद असल्याने विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना मोठी पायपीट करावी लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तर ग्रामस्थांचे हाल होत आहेत. म्हणून बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी जो काही रस्ता बाकी असेल ते काम संबंधित प्रशासन व ठेकेदार यांनी करावे, अन्यथा ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे बस सेवा सुरू करण्यात यावी म्हणून ग्रामपंचायतने ठराव लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे.

# साहित्य क्षेत्रात निराशा जनक परिस्थिती : प्रा.बी.एन. चौधरी

## ● साहित्य व सांस्कृतिक मंडळातर्फे आयोजित ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचा समारोप

प्रतिनिधी । जामनेर

**आज साहित्य क्षेत्रात निराशा जनक परिस्थिती पाहायला मिळते आहे. मोठ-मोठे बंगले बांधली जातात, पण त्या बंगल्यात त्या घरात पुस्तके किती आहेत? असा प्रश्न विचारला असता नकारात्मक उत्तर मिळते. त्या बंगल्यात देव्हाऱ्याला जागा नाही. एकही पुस्तक त्या घरात नाही. मग त्या श्रीमंतीला करायचं काय? असा प्रश्न प्रा. बी.एन. चौधरी यांनी उपस्थित केला.**

साहित्य व सांस्कृतिक मंडळातर्फे जामनेर येथे दोन दिवसीय ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलना अध्यक्ष




स्थानावरून ते बोलत होते.

पुढे बोलतांना प्रा.चौधरी म्हणाले की, जे जे साहित्यावर, कवितेवर, लेखनावर प्रेम करतात ते ईश्वराचेच पुत्र आहेत. साहित्यावर प्रेम करणारा एखादा कवी कुठे भेटला तर नातेवाईक भेटल्यापेक्षा मोठा आनंद होतो. साहित्य क्षेत्रात उद्वीग्न करणारी परिस्थिती निर्माण झाली आहे. जामनेर साहित्य मंडळाचे अध्यक्ष डी.डी. पाटील यांच्यासारखा ७५ वर्षाचा माणूस युवा साहित्य संमेलन भरवतो. ही अभिमानास्पद गोष्ट आहे. या क्षेत्रातील नकारात्मक परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आपल्याला साहित्य क्षेत्रात अजून खूप काम करायचे आहे, असेही ते म्हणाले.

### ■ स्त्री साहित्यिकांनी लेखन क्षेत्रात सक्रिय व्हावे; परिसंवादात सुर...

संमेलनात झालेल्या परिसंवादात डॉ.रमेश माने (धुळे), साहेबराव मोरे (चाळीसगाव), लतिका चौधरी (दोंडाईचा), अ.फ. भालेराव, रमेश धनगर (गिरड) यांनी खान्देशातील स्त्री साहित्यिकांच्या साहित्य प्रतिमेचा सखोल आढावा घेत नवोदित स्त्री साहित्यिकांनी लेखन क्षेत्रात सक्रिय व्हावे, असे आवाहन केले. सूत्रसंचालन शंकर भामेरे यांनी केले तर आभार पी.एन. नरवाडे यांनी मानले. यावेळी हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देत जमालुद्दीन शेख यांनी अस्कलित मराठी आणि संस्कृत भाषेतून वंदना सादर केली.

### ■ वाचनासाठी वेळ काढा; चर्चासत्रात दिला युवकांना सल्ला...

चर्चासत्रात युवकांमधील वाचनसंस्कृती डोक्यात आली आहे काय? या विषयावर डॉ. सतीश म्हस्के यांनी परखड मते मांडली. डॉ. प्रशांत पांढरे यांनी वाचनासाठी वेळ काढण्याचा सल्ला दिला तर संतोष कुमावत यांनीही आपले प्रबोधनपर विचार व्यक्त केले. गझल गायन सत्राने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तुकाराम ढिकले यांच्या गझल गायनाने श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. समारोपप्रसंगी काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन संमेलनाध्यक्ष डॉ.फुला बागुल यांच्याहस्ते गौरविण्यात आले.

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी डी.डी. पाटील, डॉ. एस.आर. महाजन, गोरख सूर्यवंशी, सुखदेव महाजन, रुपेश बिऱ्हाडे, नागनंदा मघाडे, पी.डी. पाटील यांच्यासह साहित्यिकांनी सहकार्य केले.

# भुसावळ रेल्वेस्थानकावर स्वच्छता व महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती

प्रतिनिधी । भुसावळ

**मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळ यांच्या वतीने रेल्वे स्थानक परिसरात महिला आरोग्य व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सॅनिटरी पॅड वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

या कार्यक्रमाचे नेतृत्व मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेच्या अध्यक्षा रेखा अग्रवाल यांनी केले. यावेळी मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनाच्या सदस्यांच्या उपस्थितीत भुसावळ रेल्वे स्थानकावर कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले. महिलांच्या आरोग्य संरक्षणात मासिक पाळी



स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करत, योग्य स्वच्छता पद्धती अवलंबण्याबाबत महिलांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे महिलांचे आरोग्य, आत्मसन्मान व कार्यक्षमता वृद्धिंगत होण्यास मदत होते. संघटनेतर्फे महिलांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा उपक्रम असून भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.